३१ वा सामना
पंजाब किंग्स् वि. कोलकाता नाईट रायडर्स
वेळ : ७.३० वा. स्थळ : मुलानपूर स्टेडियम

अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १५ एप्रिल २०२५ । ▶ वर्ष : २३ वे ▶ अंक : १९६ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## सोलापूर बनले 'शोला'पूर...

**सोलापूर** : राज्यात सर्वत्र गारांचा पाऊस पडेल, असा इशारा हवामान खात्याकडून दिलेला असताना पावसाचा थांगपत्ताच नाही. उलट तापमानात वाढ झाली आहे. सोमवारी सोलापूर शहराचा पारा ४२.२ अंश सेल्सिअसपर्यंत गेला होता. त्यामुळे सोलापूरकरांच्या अंगाची लाहीलाही झाली. यंदाच्या उन्हाळ्यातील तापमानाचा हा उच्चांक आहे. आठ दिवसांपूर्वी शहराचा पारा ४२ अंशांपर्यंत गेला होता.त्यानंतर ढगाळ हवामान तयार होवून तापमान खाली आहे. दोन दिवसांपूर्वी पारा ३८ अशांपर्यंत खाली आला. त्यामुळे सोलापूरकरांनी सुस्कारा सोडला होता परंतु सोमवारी पारा भलताच चढल्याने सोलापूरला शोला तयार झाला होता. सकाळी नऊ वाजल्यापासूनच अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. तेव्हाच तापमान वाढणार असल्याची कुणकुण लागली होती.

# अखेर घोडं गंगेत न्हालं, भाजप-काँग्रेसचं जुळलं



## मार्केट कमिटीच्या निवडणुकीसाठी युतीवर शिक्कामोर्तब

### ● आ.कल्याणशेट्टी-माजी आमदार माने यांच्यात दोस्ताना ● बुधवारी पॅनेल घोषित होणार ● आ.सुभाष देशमुखांनीही ठोकले शड्डू

**सोलापूर/प्रतिनिधी**

**संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्या सहकार क्षेत्राचे लक्ष लागून राहिलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत अद्भूत प्रकार पहायला मिळत आहे. देशाच्या राजकारणात भाजप आणि काँग्रेस एकमेकांना पाण्यात पाहात असताना इथे मात्र चक्क भाजप आणि काँग्रेस यांची युती झाली आहे. अक्कलकोटचे भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांच्यात दिलजमाई झाली आहे. दुसरीकडे निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या मानसिकतेत असलेले भाजप आमदार सुभाष देशमुख लागलीच रिंगणात उतरण्याचा निर्धार केला. भाजप कार्यकर्त्यांच्या हितासाठी निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी सांगितले. आ.कल्याणशेटी व माने यांची युतीतून निवडणुकीची पुढची रणनीती काय ठरते, याविषयी सहकार क्षेत्रात उत्सुकता आहे.**



बाजार समितीच्या निवडणुकीसाठी आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भाजप-काँग्रेस नेत्यांचे एकत्रित पॅनल करण्यात आले आहे. काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने, काँग्रेस कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, काँग्रेस नेते बाळासाहेब शेळके यांचा आ. कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखालील पॅनलला पाठिंबा असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. याबाबत शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेण्यात आली. १६ एप्रिल रोजी अधिकृत पॅनेल जाहीर होईल असे आ. कल्याणशेट्टी यांनी सांगितले. आ. सुभाष देशमुख आणि आ. विजय देशमुख यांनीही आमच्या बरोबर यावे, असे आवाहनही आ. कल्याणशेट्टी यांनी केले. सभापती निवडीचेही सर्व अधिकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दिल्याचे सर्व उपस्थित नेत्यांनी सांगितले.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे, माजी संचालक सुरेश हसापुरे, माजी सभापती दिलीप माने, बाळासाहेब शेळके, राजशेखर शिवदारे, माजी उपसभापती श्रीशैल नरोळे, शहाजी पवार, अविनाश महागावकर, हरीश पाटील उपस्थित होते.

### बिनविरोधच्या दृष्टीने प्रयत्न करत आहे : आ.कल्याणशेट्टी

आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली लढतोय. यामध्ये कोणत्याही पक्षीय राजकारणाचा विषय नाही. दोन्ही देशमुख हे आमचे नेते आहेत. त्यांना देखील सोबत येण्याचे आवाहन आम्ही केले आहे. पण इतक्या लोकांनी अर्ज दाखल केले आहे त्यामुळे निवडणूक बिनविरोध होणे कठीण आहे. जागा कमी आणि अपेक्षा जास्त असल्याने कोणाचेही समाधान होणार नाही. पण आम्ही बिनविरोध त्यादृष्टीने प्रयत्न करत आहे.

### आ. देशमुख आल्यास दोन जागा मिळणार?

दिलीप माने ७ जागा, सुरेश हसापुरे २, शिवदारे- शेळके प्रत्येकी १, आ. कल्याणशेट्टी २, आ. सुभाष देशमुख गट २.

### मुख्यमंत्र्यांनी सांगितले आम्ही एकत्र आलो : माने

मुख्यमंत्र्यांनी आ. कल्याणशेट्टी यांना सूचना दिल्या आहेत. त्यांनी आम्हाला आवाहन केले आहे, ते आम्हाला मान्य आहे. त्यामुळे आम्ही एकत्रित येऊन लढण्याचा निर्णय केला आहे. बाजार समितीचे हित हेच आमचे लक्ष्य आहे. पुढे आम्हाला मुख्यमंत्र्यांची गरज लागणार आहे. त्यामुळे आम्ही सहकार निवडणुकीत एकत्र येत आहोत. याबाबतीत मी स्वतंत्र निर्णय घेत असतो, मी स्वयंभू आहे, असे माजी आ. दिलीप माने यांनी स्पष्ट केले.

### आ.कल्याणशेट्टींचा निर्णय आम्हाला मान्य : हसापुरे

बाजार समिती, दूध संघ आणि डीसीसी बँकेच्या निवडणुका पक्षीय नसतात. स्थानिक पातळीवर त्याचा निर्णय होतो. आम्ही सचिन कल्याणशेट्टींच्या नेतृत्वाखाली लढणार आहोत. त्यांचा निर्णय आम्हाला मान्य आहे, असे माजी उपसभापती सुरेश हसापुरे यांनी सांगितले.

### कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करणार: आ. देशमुख

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्थानिक निवडणुका नेत्यांनी कार्यकर्त्यांसाठी लढण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार मी कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी त्यांच्या मागे उभा आहे. बाजार समिती निवडणुकीत मला पॅनेलमध्ये येण्याचे आवाहन केल्याचे कळले. मात्र जर तिकडे सर्वच भाजपाचे पदाधिकारी असतील तर मी जाण्यास तयार आहे, असे आ. सुभाष देशमुख यांनी सांगितले.

### सभापदीपदाच्या वाटणीचा फॉर्म्युला

आमदार कल्याणशेट्टी आणि माने यांच्या युतीमध्ये सभापती पदाच्या वाटणीचा फॉर्म्युला ठरला असल्याचे सांगण्यात येते. दिलीप माने व सुरेश हसापुरे यांना प्रत्येकी दोन वर्षे तर उर्वरित एक वर्ष आमदार कल्याणशेट्टी हे सांगितले. त्या संचालकास सभापती पद देण्यात येईल, असा फॉर्म्युला ठरला असल्याची चर्चा आहे.

## दुचाकी घसरल्याने तरुणाचा मृत्यू

**अकलूज** : वेगाने दुचाकीवरून जात असताना वाटेत दुचाकी घसरल्याने ३० वर्षीय तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात खंडाळी ते श्रीपुर रोडवरील म्हसवडे यांच्या शेताजवळ घडल्याचे रविवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आले.

विजय राजू पाटेकर (वय ३०, रा. शिवाजीचौक श्रीपूर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो त्याचा मित्र निखिल उघडे याची दुचाकी घेऊन शनिवारी रात्रीच्या सुमारास खंडाळी येथे गेला होता. त्यावेळी वाटेत अपघात घडून तो मरण पावला. सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर अकलूजच्या पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास हवालदार बागडे करीत आहेत.

## गाणगापूर-कुर्डूवाडी एसटी बस जळून खाक; इंजिनमध्ये बिघाड

### सुदैवाने ४० प्रवासी सुखरूप

**सोलापूर** : गाणगापूरहून कुर्डूवाडीला निघालेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसच्या इंजिनमध्ये अचानक बिघाड झाल्यामुळे एसटी पूर्णपणे जळून खाक झाली. ही दुर्घटना सोलापूर - अक्कलकोट मार्गावरील कुंभारी गावाजवळ सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.



एम. एच. २०, बी. एल.४२१५ ही कुर्डूवाडी आगाराची बस गाणगापूरहून सोलापूर - अक्कलकोटमार्गे कुर्डूवाडीला निघाली होती. सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास कुंभारी गावाजवळ इंजिनमध्ये बिघाड झाल्यामुळे बसने पेट घेतला. इंजिनमधून धूर आणि आगीचे लोट बाहेर येत असल्याचे कुर्डुवाडी आगाराचे चालक प्रशांत पांचाळ यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ एसटी बस कुंभारी गावाजवळ थांबविली आणि बसमधील सर्व ४० प्रवाशांना बाहेर पडण्यास सांगितले. मात्र अग्निशमन वाहन वेळेत न पोचल्यामुळे एसटी बस पूर्णपणे जळून खाक झाली. बसचे मात्र लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. बस जळून खाक झाली असतानासुद्धा सोलापुरातील राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना मात्र याची माहितीसुद्धा मिळालेली नव्हती. एसटी महामंडळाच्या दुसऱ्या वाहनातून प्रवाशांना त्यांच्या इच्छितस्थळी सुरक्षित पोहोच करण्यात आले. आग इतकी भीषण होती, की काही वेळातच संपूर्ण एसटी बस जळून खाक झाली. त्यामुळे रस्त्यावर बसचा सांगाडा दिसत होता.

### वाहतूक काही वेळ बंद

सोलापूर-अक्कलकोट महामार्गावर सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास महामंडळाच्या बसने पेट घेतल्यामुळे रस्ता वाहनांसाठी काही वेळ बंद करण्यात आला होता. दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. आजूबाजूंनी जाणाऱ्या वाहनांना एसटीच्या आगीची झळ पोहचू नये म्हणून विशेष खबरदारी घेण्यात आली होती.

## विवाहितेचा विनयभंग करून पतीस मारहाण

### अक्कलकोट येथील घटना; दोघांवर गुन्हा

**अक्कलकोट** : बोरीउमरगा परिसरात पूर्वीच्या भांडणावरून एका महिलेच्या घरात घुसून त्यांच्या पतीला लोखंडी सळईने मारहाण करीत महिलेचा विनयभंग करून त्यांच्या अंगावरील गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून नेल्याची घटना रविवारी दुपारच्या सुमारास घडली.

या प्रकरणी अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी धरप्पा कामण्णा उमराणीकर (रा. कुमठे, उत्तर सोलापूर) आणि भागेश भीमाशंकर वाघदरी (रा. धुळखेड,ता. इंडी) या दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला ती ४० वर्षीय महिला घरात काम करीत होत्या. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या धरप्पा आणि भागेश या दोघांनी त्यांच्या घरात घुसून पूर्वीच्या भांडणावरून त्यांच्या पतीला सळईने मारहाण करीत होते. त्यावेळी महिला भांडण सोडवण्यास आली असता दोघांनी त्यांना देखील लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र घेऊन दुचाकीवरून पसार झाले. याची नोंद त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे.

पुढील तपास हवालदार चिंचोळकर करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



भिंतीलाही कान असतात!

| |
|---|
| संगम श्री डे |
| 678-16-259 |
| संगम श्री नाईट |
| 167-43-490 |
| कल्याण |
| 257-40-389 |
| मुंबई |
| 779-38-350 |

# चैत्यभूमीवरच महायुतीत आदळआपट शिंदेंनी ठाणे गाठले, दादाही चिडून गेले

## ऐन रात्रीत भाषणातून नाव वगळल्याने संतापाचा उद्रेक

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी सोमवारी राज्यभर उत्साहाचा मोहोर असताना इकडे महायुतीच्या सरकारमध्ये घमासान सुरू होते.डॉ.बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पुनीत असलेल्या चैतन्यभूमीवरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,आणि एकनाथ शिंदे व अजितदादा पवार हे दोन उपमुख्यमंत्री यांच्यात घमासान झाल्याचे पहायला मिळाले.चैत्यभूमीवरील भाषणात शिंदे आणि पवार यांचे नाव ऐनवेळी कट केल्याने संतापाचा उद्रेक झाला.हा प्रकार लक्षात घडल्यानंतर शिंदे हे तडकाफडकी ठाण्याला निघून गेले तर अजितदादाही चिडलेल्या अवस्थेत निघून गेले पण ते कुठे गेले हे कळाले नाही. फडणवीस आणि राज्यपालांच्या भाषणानंतर दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना भाषणासाठी बोलावले नाही. यामुळे एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा आहे. तर अजित पवार हे देखील कार्यक्रम संपताच निघून गेले.राज्यात महायुती सरकारमध्ये नाराजीनाट्याच्या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे.



महायुतीचे विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक आमदार निवडून आल्याने हे सरकार भक्कम असल्याचे मानले जात आहे. असे असले तरी या सरकारमध्ये सातत्याने नाराजीनाट्याच्या घडामोडी बघायला मिळतात. महायुतीत सातत्याने विविध मुद्द्यांवर मतभेद असल्याचे बघायला मिळते. नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रीपदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. नुकतेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आले. या दौऱ्यादरम्यान शिंदे यांनी पवार यांच्याकडे असणाऱ्या अर्थखात्याबाबत तक्रार केल्याची चर्चा आहे. अर्थखात्याकडून शिवसेना मंत्री आणि आमदारांच्या फाईली वेळेवर मंजूर होत नसल्याची तक्रार शिंदेंनी शाह यांच्याकडे केली. तर शाहांनी शिंदेंना यापुढे तसे होणार नाही, असे आश्वस्त केले. नाराजीनाट्याची ही एक घटना ताजी असतानाच सोमवारी आणखी एक घटना घडली.

डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मुंबईत चैत्याभूमिवर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह महायुती सरकारमधील विविध मंत्री आणि दिग्गज नेते उपस्थित होते. या कार्यक्रमात एक धक्कादायक प्रकार बघायला मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केल्यानंतर राज्यपाल, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री मंचावर आले. यावेळी कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषण केले. नंतर राज्यपाल राधाकृष्णन यांनी भाषण केले. यानंतर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना भाषणासाठी बोलावण्यात आले नाही.

विशेष म्हणजे कार्यक्रमपत्रिकेत एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन्ही नेत्यांचे भाषण होईल, असा उल्लेख होता. त्यासाठी वेळ देखील ठरली होती. राज्यपालांच्या भाषणानंतर १० वाजून १० मिनिटांनी अजित पवार यांच्या भाषणासाठी वेळ ठरली होती. तर एकनाथ शिंदे यांच्यासाठी १० वाजून १५ मिनिटांची वेळ देण्यात आली होती. दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना भाषणासाठी प्रत्येकी ५ मिनिटे देण्यात आली होती. पण दोन्ही नेत्यांना यावेळी भाषणातून वगळण्यात आले.

### अखेर जाब विचारला

भाषणासाठी आपले नाव घेण्यात न आल्यामुळे शिंदे यांनी अधिकाऱ्यांना याबाबत प्रश्न विचारला. त्यावर अधिकाऱ्यांनी तुमचे नाव भाषणाच्या पत्रिकेत नव्हते असे म्हटले. यावर शिंदे यांनी कार्यक्रमपत्रिकेचा दाखला दिला. पण संबंधित कार्यक्रम पत्रिकेत रविवारी रात्रीच बदल करण्यात आला आणि नव्या कार्यक्रमपत्रिकेत केवळ राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांचे नाव भाषणासाठी असल्याचे अधिकाऱ्याने शिंदेंना सांगितलं. विशेष म्हणजे कार्यक्रमात भाषणासाठी तुमचे नाव नसल्याची कल्पना तुम्हाला दिली नव्हती का? असा उलटसवालच अधिकाऱ्याने शिंदेंना केला. यानंतर आता शिंदे यांच्याकडून कार्यक्रमपत्रिका बदलणाऱ्या अधिकाऱ्याची चौकशी केली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. दुसरीकडे कार्यक्रम संपल्यानंतर अजित पवार थेट निघून गेले. तर एकनाथ शिंदे यांनी ठाणे येथील निवासस्थानी येत पत्रकार परिषद घेतली.

### किती हा खोटारडेपणा...

महायुती सरकारचा खोटारडेपणा सातत्याने या राज्याला पहायला मिळत आहे.सरकारमध्ये रोज घमासान होत आहे.असे असताना सरकारमध्ये शांती शांती आहे,असा दावा केला जातो.हा खोटारडेपणा हे सरकारमधील तीनही नेते किती दिवस करणार आहेत,असा सवाल राज्यभरातून उपस्थित केला जात आहे.